## निवडक

### गोवा अग्निशमन विभागात एनएफएससी प्रशिक्षण

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १५ :** गोवा अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालयाने नागपूरच्या गृह मंत्रालयाच्या राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयातील (एनएफएससी) बी.टेक (अग्निशमन अभियांत्रिकी) शाखेतील अंतिम वर्षातील १० प्रशिक्षणार्थ्यांसाठी १ एप्रिल ते १५ मे २०२५ या कालावधीत पहिल्यांदाच एक व्यापक आणि सखोल व्यावसायिक संलग्नक कार्यक्रम यशस्वीरित्या राबवला.

या ४५ दिवसांच्या संलग्नक उपक्रमात प्रशिक्षणार्थ्यांना प्रारंभी ३० दिवसांची स्टेशन ड्युटी पणजी येथील अग्निशमन केंद्र आणि मुख्यालयात दिली गेली. यानंतर पुढील १५ दिवस उच्च-जोखमीच्या औद्योगिक प्रतिष्ठाने, शॉपिंग मॉल्स, उंच इमारती, रुग्णालये आणि हॉटेल्स याठिकाणी प्रत्यक्ष व्यावसायिक अनुभव देण्यात आला. गोवा राज्यात अशा स्वरूपाचा प्रशिक्षण कार्यक्रम प्रथमच आयोजित करण्यात आला असून, तो विभागाच्या व्यावसायिक कौशल्यवृद्धी आणि अग्निशमन सेवा आधुनिकीकरणासाठी असलेल्या कटिबद्धतेचे प्रतीक मानला जात आहे.

या संलग्नक उपक्रमाचा समारोप १५ मे रोजी विशेष समारंभात करण्यात आला. यावेळी अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा संचालनालयाचे संचालक श्री. नितीन रायकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या समवेत विभागीय अधिकारी (उत्तर गोवा) श्री. श्रीपाद गावस आणि उपसंचालक (प्रशासन) श्री. पुंडलिक परब यांचीही उपस्थिती होती.

संचालक श्री. नितीन रायकर यांनी प्रशिक्षणार्थ्यांचे त्यांच्याकडून दाखवण्यात आलेल्या समर्पणाबद्दल अभिनंदन केले आणि त्यांच्याद्वारे पूर्ण करण्यात आलेल्या संलग्नकार्यक्रमाचे कौतुक केले. प्रत्यक्ष अनुभवाचे प्रशिक्षणात असलेले महत्त्व अधोरेखित करत, त्यांनी प्रशिक्षणार्थ्यांना या ज्ञानाचा उपयोग त्यांच्या भावी कार्यक्षेत्रात करावा, असे आवाहन केले. त्यांनी भारतभरात अग्निशमन आणि आपत्कालीन सेवांमध्ये व्यावसायिक उत्कृष्टता, सुरक्षा मानकांचे पालन आणि संस्थांमध्ये समन्वय साधण्याच्या उद्दिष्टांवर विभागाचे लक्ष केंद्रित असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे समारोप सत्र स्टेशन अग्निशमन अधिकारी श्री. रूपेश सावंत यांनी यशस्वीपणे संयोजित केले. विभागीय अधिकारी श्री. श्रीपाद गावस यांनी प्रशिक्षणार्थ्यांच्या उत्साहाचे आणि क्षेत्रीय युनिट्स तसेच होस्ट संस्थांच्या सहकार्याचे विशेषतः कौतुक केले.

संचालनालय भविष्यातही अशा प्रशिक्षण उपक्रमांचा विस्तार करण्यास उत्सुक असून, शैक्षणिक आणि व्यावहारिक सहकार्याच्या माध्यमातून देशाच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेला अधिक सक्षम बनवण्याच्या दिशेने पुढे जाणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# मुंबई-दिलीत होणार प्ले -ऑफ साठी तगडा संघर्ष

## १७ मे पासून पून्हा रंगणार आयपीएलचे सामने | ७ संघांमध्ये होणार प्लेऑफची शर्यत

**नवी दिल्ली, दि १५ :**

आयपीएलच्या १८ व्या हंगामाला एका आठवड्याच्या ब्रेकनंतर पुन्हा सुरुवात होणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढल्याच्या पार्श्वभूमीवर आयपीएल स्थगित करण्यात आलं होतं. दोन्ही देशांमध्ये शस्त्रसंधी झाल्यानं तणाव कमी झाल्यानं आयपीएल पुन्हा १७ मे पासून सुरु करण्यात येणार आहे. आयपीएल च्या १८ व्या हंगामाची अंतिम फेरीची लढत नव्या वेळापत्रकानुसार ३ जूनला होणार आहे. चेन्नई सुपर किंग्ज, राजस्थान रॉयल्स आणि सनरायजर्स हैदराबाद हे तीन संघ फ्ले ऑफच्या शर्यतीतून बाहेर गेले आहेत. आता राहिलेल्या ७ संघांमध्ये प्लेऑफची शर्यत आहे. गुणतालिकेत पहिल्या चार स्थानांवर असलेल्या संघांना प्लेऑफमध्ये प्रवेश मिळेल.

गुजरात टायटन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु, पंजाब किंग्ज हे तीन संघ आयपीएल प्लेऑफच्या शर्यतीत आघाडीवर आहेत.तर, मुंबई इंडियन्स, दिल्ली कॅपिटल्स, लखनौ सुपर जायंट्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात चौथ्या स्थानासाठी शर्यत आहे. यापैकी मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्समध्ये तगडी स्पर्धा आहे.



गुजरात टायटन्स : शुभमन गिलच्या नेतृत्त्वात गुजरात टायटन्सनं ११ पैकी ८ सामने जिंकले आहेत. त्यापैकी तीन सामन्यात त्यांचा पराभव झाला आहे. तर, गुजरात टायटन्सकडे १६ गुण आहेत. प्लेऑफमध्ये प्रवेश करण्यासाठी त्यांना तीन पैकी किमान एक मॅच जिंकावी लागेल. जर टीमनं राहिलेल्या तीन पैकी दोन मॅचेसमध्ये विजय मिळवला तर ते टॉप २ मध्ये स्थान मिळवतील.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु : आरसीबी आणि केकेआर यांच्यात १७ मे रोजी मॅच होणार आहे. आरसीबीकडे केकेआरला पराभूत करत प्लेऑफमध्ये प्रवेश करणारा पहिला संघ होण्याची संधी शक्यता आहे. आरसीबीनं ११ सामन्यात १६ गुण मिळवले आहेत.

पंजाब किंग्ज : श्रेयस अय्यरच्या पंजाब किंग्जनं ११ पैकी ७ मॅचेस जिंकल्या आहेत. त्यांच्याकडे १५ गुण आहेत. कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातील सामना रद्द झाला आहे. तर, पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील मॅच पुन्हा होणार आहे. पंजाबला राहिलेल्या तीन पैकी किमान २ मॅचेस जिंकाव्या लागतील.

मुंबई इंडियन्स :मुंबई इंडियन्सनं १२ सामन्यात १४ गुण मिळवले आहेत. मुंबईचं नेट रन रेट (+१ .१५६ ) इतकं आहे. मुंबईला पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध विजय मिळवावा लागेल. मुंबईचा एका सामन्यात जरी पराभव झाला तरी दिल्ली कॅपिटल्सला त्याचा फायदा होऊ शकतो.

दिल्ली कॅपिटल्स : दिल्ली कॅपिटल्सनं यंदाच्या आयपीएलमध्ये दणक्यात सुरुवात केली होती. मात्र, मुंबई विरुद्ध पराभव झाल्यानंतर त्यांची लय बिघडली. आता त्यांच्याकडे तीन सामने जिंकत १९ गुणांपर्यंत पोहोचण्याची संधी आहे. दिल्लीनं दोन सामने जिंकले तर मुंबईचा एका सामन्यात पराभव झाल्यास त्यांना प्लेऑफचं तिकीट मिळेल.

लखनौ सुपर जायंटस : रिषभ पंतची लखनौ सुपर जायंटस अजूनही प्लेऑफच्या शर्यतीत आहे. त्यांच्याकडे १६ गुणांपर्यंत पोहोचण्याची संधी आहे. एक जरी पराभव झाला तर ते स्पर्धेबाहेर जाऊ शकतात. लखनौनं ११ सामन्यात १० गुण मिळवले आहेत. लखनौचे पुढील सामने आरसीबी, गुजरात आणि सनरायडर्स हैदराबाद विरुद्ध होणार आहेत.




**विजेत्या माऊली पेकर्स संघास चषक प्रदान करताना आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, शंकर बेतकेकर, गंधेश काणेकर,विशाल डिचोल कर, चंदन फोगेरी,व इतर.**

# माऊली पॅकर्स मेणकुरे संघ विजेता

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १५ :** रफ रायडर्स क्लब आयोजित डिचोली मतदार संघ मर्यादित भव्य क्रिकेट स्पर्धेत माऊली पॅकर्स मेणकुरे संघाला विजेतेपद तर सातेरी बॉईज लाडफे संघाला उपविजेत्या स्थानावर समाधान मानावे लागले.

विजयी संघास डॉ. चंद्रकांत शेट्ये पुरस्कृत रोख एकसष्ट हजार उपविजेत्या संघास एक्तीस हजर व चषक देण्यात आले. तीन दिवशीय या स्पर्धेत दहा संघाने भाग घेतला.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभ आमदार डॉ. चंद्रकांत शेटये, गंधेश काणेकर,विशाल डिचोलकर, चंदन फोगेरी, संजीव वे र्णेकर, गजानन बोर्डे कर,, अभिजित तेली, रामा परब, सतिश ढवळे,सुभाष देसाई रुद्रेश चणे कर, गोकुळदास हरमल कर,शंकर बेतकीकर उपस्थित होते. स्पर्धेचे सूत्रसंचालन ऐश्वर्या चारी तर आभार रफ रायडर्सचे शंकर बेतकीकर यांनी केले.

# अर्शद नदीमशी वैयक्तिक जवळीक नाही -नीरज चोप्रा

**दोहा, दि. १५ :**

भारताचा सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा याने स्पष्ट केले आहे की, पाकिस्तानचा ऑलिंपिक पदक विजेता अर्शद नदीम याच्याशी त्याचे फारसे वैयक्तिक नाते नाही. मात्र, कोणी आदराने वागले तर आपणही तसाच प्रतिसाद देतो, असे त्याने म्हटले आहे.

दोहा येथे शुक्रवारी होणाऱ्या डायमंड लीग स्पर्धेच्या पूर्वसंध्येला झालेल्या पत्रकार परिषदेत नीरज चोप्रा बोलत होता . यावेळी त्याला अलीकडील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान संबंध आणि अर्शद नदीमसोबतच्या त्यांच्या नात्यावर प्रश्न विचारण्यात आला .

चोप्रा याने सांगितले की , सर्वप्रथम, मी हे स्पष्ट करू इच्छितो की माझे अर्शद सोबत वैयक्तिक पातळीवर फारसे घट्ट नाते नाही. एक खेळाडू म्हणून संवाद होतोच. माझे काही चांगले मित्र ॲथलेटिक्स क्षेत्रात आहेत . केवळ भालाफेकीपुरते मर्यादित नसून इतर




खेळांमध्येही. मात्र, जो माझ्याशी आदराने वागतो, त्याच्याशी मीही तसाच वागतो.

टोकियो ऑलिंपिकपासून चोप्रा आणि नदीम भालाफेकीच्या जागतिक पटलावर झगमगले आहेत. टोकियोमध्ये नीरजने सुवर्णपदक जिंकून भारताला ट्रॅक आणि फील्डमध्ये पहिले ऑलिंपिक सुवर्ण मिळवून दिले, तर नदीमने पाचवे स्थान पटकावले. पॅरिसमधील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत मात्र नदीमने सुवर्णपदक जिंकत पाकिस्तानसाठी ऐतिहासिक कामगिरी केली, तर चोप्राने रौप्यपदकावर समाधान मानले.

या वर्षी मात्र दोघांमध्ये थेट टक्कर होण्याची शक्यता कमी आहे. चोप्रा डायमंड लीग व पोलंडमधील स्पर्धांतून आपला हंगाम सुरू करणार आहे, तर नदीमने आशियाई अजिंक्यपद स्पर्धेसाठी तयारी केली आहे.

दरम्यान, गेल्या महिन्यात नीरज चोप्राने एक अधिकृत निवेदन जारी करून स्पष्ट केले होते की, अर्शद नदीमला नीरज चोप्रा क्लासिक' या स्पर्धेसाठी आमंत्रित केल्यावर त्याच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर टीका आणि द्वेषाची लाट उसळली.

अर्शदला माझ्या क्लासिक स्पर्धेसाठी आमंत्रित केल्यावर अनेकांनी द्वेषपूर्ण प्रतिक्रिया दिल्या. माझ्या कुटुंबालाही यातून वगळण्यात आले नाही,असे चोप्रा म्हणाला होता . हे आमंत्रण एका खेळाडूकडून दुसऱ्या खेळाडूस दिले गेले होते. या क्लासिकचा उद्देश भारतात जागतिक दर्जाचे ॲथलेटिक्स आयोजन करणे हा होता. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या दोन दिवस आधीच सर्व आमंत्रणे पाठवण्यात आली होती. त्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत नदीम याची उपस्थिती शक्यच नव्हती.

# बीसीसीआय ऑलिंपिकसाठी पुढे सरसावले

## क्रीडा मंत्रालयाच्या केंद्र उभारणी उपक्रमात सहभागाची तयारी

**नवी दिल्ली, दि. १५ :**

क्रीडा मंत्रालयाच्या कॉर्पोरेट सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक उत्कृष्टता केंद्र योजनेत भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) सक्रिय सहभाग घेण्यास उत्सुक असून, दोन ते तीन ऑलिंपिक खेळांच्या प्रशिक्षणासाठी जबाबदारी स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे. गुरुवारी केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत बीसीसीआयने आपली भूमिका स्पष्ट केली.

बैठकीस ५८ प्रमुख कॉर्पोरेट घराण्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीदरम्यान बीसीसीआयचे प्रतिनिधित्व करत असलेले उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी बोर्डच्या या भूमिकेची माहिती दिली. बीसीसीआय दोन ते तीन ऑलिंपिक खेळांचा अवलंब करण्यास तयार असून, त्या खेळांची निवड मंत्रालयाच्या सल्ल्यानुसार केली जाईल, अशी माहिती क्रीडा मंत्रालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

मंत्रालयाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत देशभरात खेळांनुसार ऑलिंपिक केंद्रे स्थापन करण्यात येणार असून, सध्याच्या आणि आगामी ऑलिंपिक चक्र लक्षात घेता, देशातील १०० ते २०० सर्वोत्तम खेळाडूंना प्रशिक्षित करण्याचा उद्देश आहे.

भारतामध्ये सध्या २३ राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्रे कार्यरत असून, ती भारतीय क्रीडा




प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहेत. यापैकी रोहतकमधील बॉक्सिंग, दिल्लीतले पोहणे आणि नेमबाजी हे तीन केंद्रे विशिष्ट खेळांसाठी समर्पित आहेत. सर्वांत मोठी केंद्रे पटियाला आणि बेंगळुरूमध्ये असून ती एकाधिक खेळांसाठी सेवा पुरवतात.

मांडविया यांनी योजनेच्या प्रेरणास्त्रोतांबाबत बोलताना सांगितले की, जपान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलियातील उत्कृष्ट प्रशिक्षण पायाभूत सुविधांचा अभ्यास केल्यानंतर ही योजना सुचली आहे.

बीसीसीआयने यापूर्वीही ऑलिंपिक खेळांना आर्थिक पाठबळ दिले आहे. २००८ मध्ये राष्ट्रीय क्रीडा विकास निधीमध्ये ५० कोटी रुपये आणि २०२४ च्या पॅरिस ऑलिंपिकपूर्वी भारतीय ऑलिंपिक संघटनेला ८.५ कोटी रुपये मदत दिली होती. तसेच, २०२१ च्या टोकियो ऑलिंपिकमध्ये पदकविजेत्यांना एकूण ४ कोटी रुपयांचे रोख बक्षीसही देण्यात आले होते.

तथापि, प्रशिक्षण आणि खेळाडू घडवण्याच्या दिशेने बीसीसीआयचा हा पहिलाच प्रत्यक्ष सहभाग असणार आहे.

फुटबॉल आणि टेनिस यांसारख्या खेळांमध्ये भारताचा आंतरराष्ट्रीय प्रभाव कमी असल्याच्या पार्श्वभूमीवर, परदेशात स्थायिक असलेल्या भारतीय वंशाच्या खेळाडूंना (ओसीआय कार्डधारक) देशाचे प्रतिनिधित्व करण्यास बंदी घालण्याच्या निर्णयावर पुनर्विचार होण्याची शक्यता आहे. सध्या फक्त भारतीय पासपोर्टधारकांनाच देशासाठी खेळण्याची परवानगी आहे.

क्रीडा मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने यासंदर्भात माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार , भारतीय क्रीडा प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी ही बंदी शिथिल करण्याचा विचार करण्यात येत आहे.मात्र, ही प्रक्रिया अद्याप प्राथमिक टप्प्यात असून, विविध क्रीडा महासंघांशी विचारमंथन सुरू आहे.ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशन या संकल्पनेसाठी विशेषत: उत्सुक आहे. टेनिसच्या बाबतीत, भारताचे माजी टेनिसपटू विजय अमृतराज यांचा मुलगा प्रकाश हा ओसीआय कार्डधारक असलेल्या प्रमुख खेळाडूंपैकी होता. परंतु नियमांमुळे त्याला भारताकडून खेळण्याची संधी मिळाली नाही.

# आयपीएलचे उर्वरित सामने चीअरलीडर्स आणि डीजेशिवाय ?


**मुंबई, दि. १५ :**

आयपीएल २०२५ पुन्हा सुरू होण्यासाठी सज्ज असून, शनिवार, १७ मेपासून उर्वरित सामने खेळवले जाणार आहेत. दरम्यान, माजी महान फलंदाज सुनील गावस्कर यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडे (बीसीसीआय) विशेष विनंती केली आहे की , या सामन्यांमध्ये चीअरलीडर्स आणि डीजेचा वापर करू नये .

गावस्कर यांच्या या सूचनेनंतर बीसीसीआयनेही यावर गंभीरपणे विचार सुरू केला आहे, अशी माहिती इंडिया टुडेने दिली आहे. ८ मे रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात शोककळा पसरली असून, या पार्श्वभूमीवर आयपीएलला आठवडाभरासाठी स्थगित करण्यात आले होते. या हल्ल्यात २६ नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.

इंडिया टुडेच्या वृत्तानुसार, आयपीएल २०२५चे उर्वरीत सामने कोणताही अतिरिक्त ग्लॅमर, संगीत वा चीअरलीडर्सशिवाय खेळवले जाण्याची शक्यता आहे.

या निर्णयामागे गावस्कर यांची भावनिक भूमिका अधोरेखित झाली



आहे. स्पोर्ट्स टुडेला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले की , आपण जवळपास ६० सामने पार पाडले आहेत. आता उरलेले १५-१६ सामने आहेत. अशा दुर्दैवी घटनेनंतर, ज्या काही कुटुंबांनी आपले जवळचे गमावले आहेत, त्यांच्या भावना लक्षात घेऊन उर्वरित सामने केवळ खेळापुरते मर्यादित ठेवावेत. डीजेची घोषणा, नाचणाऱ्या चीअरलीडर्स यासारखे कार्यक्रम या सामन्यांतून वगळावेत. प्रेक्षक असू द्या, पण उगाचचा जल्लोष नाही.

गावस्कर पुढे म्हणाले की , या कठीण प्रसंगी केवळ क्रिकेट हा एकमात्र असा मार्ग आहे ज्यातून आपण संयम आणि एकात्मतेचे प्रदर्शन करू शकतो. कुटुंबीयांच्या दुःखाचा आदर राखत या सामन्यांना केवळ स्पर्धात्मक मूल्य द्यावे.

दरम्यान, सनरायझर्स हैदराबाद आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील अलीकडील सामन्यात दोन्ही संघांनी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करत काळ्या पट्ट्या परिधान केल्या होत्या. त्या सामन्यात ना चीअरलीडर्स होत्या, ना आतषबाजी. तसेच, खेळ सुरू होण्यापूर्वी एक मिनिट मौन पाळून शोक व्यक्त करण्यात आला होता.

जगभरातून या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध होत असतानाच, बीसीसीआयचा संभाव्य निर्णय हा एक सामाजिक जाणीव जपणारा पाऊल ठरू शकतो.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २५३ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 253 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .